# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

## मंगळवार, दिनांक ०५ डिसेंबर, २०२३/ अग्रहायण १४, १९४५ (शके)

**१५३.** महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०२ (३) अन्वये मंगळवार, दिनांक ०५ डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता **श्रीमती पुष्पा दळवी, अवर सचिव यांचे दालन क्रमांक १६, पहिला मजला, विधान भवन, नागपूर** येथे संगणकीय आज्ञावलीद्वारे अशासकीय ठरावांचा प्राथम्यक्रम काढण्यात आला आहे. निदेशानुसार सदरहु ठराव **शुक्रवार, दिनांक ०८ डिसेंबर, २०२३ रोजी** खालीलप्रमाणे चर्चेला घेण्यात येणार आहेत :-

**(मंगळवार, दिनांक ०५ डिसेंबर, २०२३ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत) -**

**(१) श्री.सुरेश धस, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ६६**

"विश्ववंदनीय "छत्रपती शिवाजी महाराजांचा" व स्वराज्य रक्षक "छत्रपती संभाजी महाराजांच्या" गौरवपूर्ण, वैभवशाली, आदर्शवादी, स्वातंत्र्याचं प्रतिक असलेला, महाराष्ट्राची मान जगात स्वाभिमानान उंचवणारा दृष्टीमान इतिहास हा शालेय शिक्षणात अत्यंत संक्षिप्त स्वरुपात आहे. हा संपूर्ण इतिहास राज्यात इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या अभ्यासक्रमात टप्प्याटप्प्याने समाविष्ट करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करित आहे."

**(२) श्री.अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक २९**

"विदर्भात वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प आहेत, राज्यातील वीज निर्मितीपैकी निम्मा वीज निर्मितीचा वाटा विदर्भाचाच असून त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर भारनियमन होते, भारनियमनामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान, व्यापारी जगात होणारे आर्थिक नुकसान, विदर्भातील वीज इतरत्र जात असतानासुध्दा विदर्भातील वीज ग्राहकांकडून वीज हानीच्या नावाने पैसा वसूल करण्यात येतो, वीजेअभावी शेती सिंचनापासून वंचित राहणे यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे होणारे प्रचंड नुकसान, विजेअभावी विदर्भात उद्योग न येणे, परिणामी बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे, विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषण होऊन देखील तेथील विकास होत नाही, विदर्भात उत्पादीत उद्योगांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याची नितांत गरज लक्षात घेता विदर्भातील भारनियमन रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे".

**(3) श्री.जयंत आसगांवकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक २५**

"राज्यातील विनाअनुदान तत्वावरील मान्यता प्राप्त माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(४) श्री.रमेशदादा पाटील, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ५३**

"राज्यातील अनुसूचित जमातीच्या जात पडताळणी समित्यांनी दिलेल्या निर्णयाला फक्त उच्च न्यायालयातच अपिल करता येत असल्याने अनेक प्रकरणे निर्णय देताना हेतुपुरस्पर, पुर्वग्रह दूषितपणे जाणीवपूर्वक विरोधात दिले गेल्याचे मा.उच्च न्यायालयात व मा.सर्वोच्च न्यायालयात वारंवार सिध्द होत असून अनेक प्रकरणी जात पडताळणी समित्यांना लाखांवर दंड, समज व निर्णय समितीच बरखास्त केल्याचे मा.उच्च न्यायालयाने/ मा.सर्वोच्च न्यायालयाचे शास्ती म्हणून आहे. जातपडताळणी समित्या त्यांचे निर्णय काही विवक्षित कारणामुळे मोठ्या प्रमाणात बदलत असल्याचे निदर्शनास येत असल्याने संपूर्ण आदिवासी समाजात जात पडताळणी समितीचे कामकाज पक्षपातीपणे होत असल्याचा जनक्षोभ मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेला आहे. खरा लाभार्थी वैधता प्रमाणपत्रापासून वंचित राहू नये म्हणून राज्य शासनाने राज्यातील अनुसूचित जमातीच्या जातपडताळणी समित्यांवर न्यायाधिशांची नेमणूक करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(५) श्री.सुधाकर अडबाले, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ३९**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
नागपूर
दिनांक : ०७ डिसेंबर, २०२३

**जितेंद्र भोळे**
सचिव (१)(कार्यभार)
महाराष्ट्र विधानपरिषद

**<u>याची प्रत :-</u>**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य
२) मा.उप सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) सचिव (१)(कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
५) सचिव (२)(कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी
७) प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, विधान भवन, नागपूर
८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
९) संगणक कक्ष (संकेतस्थळ)
१०) एम.के.सी.एल.कक्ष (आज्ञावली)